रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक २३३
www.ramprahar.com
◆ गुरुवार, १२ मार्च २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## राजिप अध्यक्ष भाजपचा होणार; आज निवडणूक



**अलिबाग :** रायगड जिल्हा परिषदेच्या (राजिप) अध्यक्ष व उपध्यक्षपदाची गुरुवारी (दि. १२) निवड होणार आहे. भाजपचा अध्यक्ष होणार हे निश्चित मानले जात आहे. राजिपच्या इतिहासात पहिल्यांदाच भाजपचा अध्यक्ष विराजमान होणार आहे. त्यामुळे भाजपने अलिबागमध्ये आनंदोत्सवाची तयारीदेखील सुरू केली आहे. रायगड जिल्हा परिषदेची निवडणूक ७ फेब्रुवारीला झाली. ९ फेब्रुवारी रोजी जाहीर झालेल्या निकालानुसार भाजपला १५, राष्ट्रवादी काँग्रेस १६, शिवसेना शिंदे गटाला २१, शिवसेना ठाकरे गट ५, काँग्रेसला २ जागा मिळाल्या. कुठल्याच पक्षाला बहुमत मिळाले नसले तरी निवडणूकपूर्व युती असल्याने भाजप राष्ट्रवादी-काँग्रेसने मिळून बहुमताचा आकडा गाठला. त्यामुळे या दोन्ही पक्षांनी सत्ता स्थापन करण्याच्या हालचाली सुरू केल्या. **(पान २ वर..)**

## अंतरंग

पनवेल पंचायत समितीवर भाजपचे कमळ फुलले/३
आला उन्हाळा तब्येत सांभाळा; पालिकेचे नागरिकांना आवाहन/६
आयपीएल २०२६मधील सामन्यांमध्ये होणार बदल/८




वारसा विश्वासाचा, आता येत आहे उरणमध्ये!

॥ भव्य शुभारंभ ॥
१३ मार्च २०२६ रोजी, सायं. ०५.३० वाजता.



माधुरी दीक्षित
यांच्या हस्ते उद्घाटन

३०% फ्लॅट सूट*
सोन्याच्या दागिन्यांच्या घडणावळीवर

१००% फ्लॅट सूट*
हिऱ्यांच्या दागिन्यांच्या घडणावळीवर

उरणमध्ये सुरू होत असलेल्या पीएनजी ज्वेलर्सच्या दालनाच्या भव्य उद्घाटन सोहळ्यासाठी आम्ही आपली वाट पाहतोय.

PNG
JEWELLERS

*अटी लागू. ऑफर १३ मार्च ते ३ एप्रिल २०२६ या कालावधीत.

ग्रँड उरण सेंट्रल, सर्व्हे नंबर ७९/५अ, आनंदनगर, ता. उरण, नवी मुंबई - ४०० ७०२.

Toll Free No.: 1800 233 5005 (11 A.M. - 7 P.M.) www.pngjewellers.com I info@pngadgil.com
INDIA I USA


# काळ-कुंभे प्रकल्प व पुनर्वसन कामांना गती द्यावी

## जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांचे निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांवर शासन सकारात्मक असून, जनहिताच्या दृष्टीने पुनर्वसन कामे व प्रकल्पाला तातडीने गती देण्याचे निर्देश जलसंपदा (विदर्भ, तापी, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ) व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी दिले. बैठकीला रोजगार हमी योजना व फलोत्पादन मंत्री भरत गोगावले उपस्थित होते.

मंत्रालयात रायगड जिल्ह्यातील महाड व माणगाव तालुक्यातील काळ-कुंभे जलविद्युत प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसन व प्रलंबित प्रश्नांबाबत बैठक झाली. यावेळी अपर मुख्य सचिव (जलसंपदा) दीपक कपूर, सचिव (प्रकल्प व विकास) संजय बेलसरे, रायगडचे जिल्हाधिकारी किसन जावळे, प्रकल्पग्रस्त प्रतिनिधी महापालिकेचे नगरसेवक दीपक कोतकर यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



बैठकीत प्रकल्पग्रस्तांनी पुनर्वसन, नुकसानभरपाई, तसेच धरणाच्या कामातील प्रलंबित बाबी यासंदर्भात विविध मुद्दे मांडले. सर्व मागण्यांबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करुन प्रलंबित प्रश्नांचा सविस्तर आढावा घेऊन ते मार्गी लावण्यात येतील असे जलसंपदा मंत्री महाजन यांनी सांगितले.

बैठकीत या प्रकल्पाला झालेला विलंब पाहता योग्य नुकसानभरपाई देण्याची मागणीवर सकारात्मक दृष्टीने पाहण्याची ग्वाही देत मंत्री महाजन यांनी संबंधित अधिकाऱ्यांना प्रकल्पातील अडथळे दूर करून प्रलंबित कामे गतीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले. पुनर्वसन व इतर मागण्यांबाबत विभागीय स्तरावर समन्वय साधून योग्य निर्णय घेतले जातील, असे त्यांनी सांगितले.

यावेळी पुनर्वसन प्रक्रिया पारदर्शक व वेगाने पूर्ण केली जाईल. धरणाच्या कामाबाबत आवश्यक प्रशासकीय निर्णय घेऊन प्रकल्प पुढे नेण्यासाठी शासन सकारात्मक असल्याचेही मंत्रीद्वयांनी स्पष्ट केले.

**प्रकल्पग्रस्तांना न्याय देणे ही शासनाची प्राथमिकता**

प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळणे ही शासनाची प्राथमिकता असून कुटुंबसदस्य संख्या, बाधित जमीनीचे प्रमाण आणि अन्य निकषाच्या आधारे याबाबत निर्णय घेण्यात यावेत असे रोहयो मंत्री भरत गोगावले यांनी सांगितले.

प्रकल्पबाधित कुटुंबीयांची वर्गवारी आणि सर्वांचे पुनर्वसन त्या गावांच्या सर्वेक्षणामधील सर्व अडचणी दूर करण्यात येईल असे ही यावेळी सांगण्यात आले.

काळ-कुंभे दोन्ही प्रकल्प स्वतंत्र झाले असून या दोन्ही प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांवर सकारात्मक भूमिका घेतांना, या विषयावर तातडीने स्वतंत्र बैठकीचे आयोजन करण्यात येईल. तसेच एनटीपीसी लिमिटेड या केंद्र सरकारच्या ऊर्जा कंपनीच्या समवेत बैठक घेण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.

# वाशी जुहू मिनी चौपाटी येथे आगरी-कोळी समाजाचा अपमान

## पारंपरिक वेशातील पुतळ्याच्या हातात दारूची बाटली

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी, जुहू मिनी चौपाटी येथे आगरी कोळी शिल्पाबाबत गैर कृत्य केल्याचे एका व्हिडिओच्या माध्यमातून उघड झाल्याने आगरी कोळी समाजात संताप पसरला आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेने या ठिकाणी आगरी-कोळी समाजाचा इतिहास आणि परंपरा लोकांना कळावी म्हणून पारंपरिक पोशाखातील कोळी पुरुष आणि महिलांचे शोभिवंत पुतळे उभारले आहेत. हा आगरी कोळी समाजाच्या संस्कृतीचा आणि इतिहासाचा सन्मान आहे, परंतु मंगळवारी दुपारी काही तरुण त्या ठिकाणी आले. त्यांनी अश्लील शिवीगाळ करत, या आगरी कोळी समाजाच्या पारंपरिक वेशातील पुतळ्याच्या हातात दारूच्या बाटल्या अडकवत शिवीगाळ केली. एक तरुण याचे चित्रीकरण करत होता.

इन्स्ट्राग्राम या समाजमाध्यमांवर इलियास या अकाउंटवर हा व्हिडिओ पोस्ट केला गेला आहे. मुख्य म्हणजे दारूच्या बाटल्या अडकवून हे तरुण थांबले नाहीत. तर अश्लील शिवीगाळ तसेच अश्लील कृत्य देखील करण्याचा प्रयत्न केला. व्हिडिओ चित्रीकरण करणाऱ्या तरुणांकडून या तरुणाला अधिक भडकवण्यात येत होते. याविषयी आगरी कोळी समाजातून तीव्र भावना व्यक्त होत आहेत.

महापुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याशी असा प्रकार कोणी करण्याची हिंमत करणार नाही, हे सर्वांना माहिती आहे.



**मुंबई आणि नवी मुंबई ही आगरी-कोळी समाजाची भूमी आहे. तुम्ही रोजगारासाठी, व्यवसायासाठी येथे स्थलांतरित झाले आहात, ते स्वागतार्ह आहे. पण या मातीतल्या संस्कृतीचा आणि स्थानिक समाजाचा आदर ठेवणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. अशा कृत्यांवर तातडीने कारवाई होणे आवश्यक आहे.**
**-शरद पाटील**
**ग्रामस्थ, तुर्भे गाव**


# श्रीवर्धनमध्ये भटक्या कुत्र्यांचा हैदोस

## मुलगा गंभीर जखमी; प्रशासनावर नागरिकांचा संताप

**श्रीवर्धन: रामप्रहर वृत्त**

शहरात भटक्या कुत्र्यांची वाढती संख्या आणि त्यांचा आक्रमक स्वभाव यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या काही दिवसांत कुत्र्यांच्या हल्ल्यांच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असून, शुक्रवारी घडलेल्या एका धक्कादायक घटनेत भटक्या कुत्र्याने एका लहान मुलावर हल्ला करून त्याला गंभीर जखमी केले. या घटनेमुळे पालकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले असून, स्थानिक प्रशासनाच्या कामकाजावर नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

स्थानिक नागरिकांच्या माहितीनुसार, शहरातील विविध भागांमध्ये भटक्या कुत्र्यांचे मोठे टोळके फिरताना दिसतात. काही दिवसांपूर्वीच एका महिलेवर कुत्र्यांच्या टोळीने हल्ला करून तिला जखमी केले होते. ही घटना ताजी असतानाच लहान मुलावर झालेल्या हल्ल्यामुळे



नागरिकांमध्ये प्रचंड भीती निर्माण झाली आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, शहरातील प्रत्येक नाका, चौक आणि गल्लीमध्ये कुत्र्यांचे टोळके दिसून येतात. विशेषतः संध्याकाळच्या वेळी घराबाहेर पडणे धोकादायक झाले आहे. काही वेळा हे कुत्रे लोकांच्या हातातील अन्नपदार्थ किंवा वस्तू हिसकावून नेण्याचे प्रकारही घडत आहेत. यामुळे विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढली आहे,भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक असलेली निर्बीजीकरण (स्टेरिलायझेशन) मोहीम अनेक वर्षांपासून प्रभावीपणे राबवली जात नसल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. नगर परिषदेने यासाठी निविदा काढली होती, मात्र कोणत्याही संस्थेकडून प्रतिसाद न मिळाल्यामुळे ही प्रक्रिया रखडल्याचे सांगितले जात आहे.

प्रशासनाचे आश्वासन या पार्श्वभूमीवर श्रीवर्धन नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष अनंत गुरव यांनी सांगितले की, मोकाट कुत्रे पकडण्यासाठी तसेच त्यांच्या निर्बीजीकरण आणि रेबीज लसीकरणासाठी लवकरच नवीन निविदा काढण्यात येणार आहेत. प्रशिक्षित कर्मचाऱ्यांमार्फत ही मोहीम लवकरात लवकर राबवली जाईल.

दरम्यान, प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा काही नागरिकांनी दिला आहे. तोपर्यंत पालकांनी लहान मुलांवर विशेष लक्ष ठेवावे, असे आवाहनही करण्यात येत आहे.

# रोहा सभापतीपदी विजया पाशिलकर, उपसभापतीपदी संजय मांडलूसकर बिनविरोध

**धाटाव ,रोहा : प्रतिनिधी**

रोहा पंचायत समितीच्या सभापतीपदी विजया विनोद पाशिलकर तर उपसभापतीपदी संजय संभाजी मांडलूसकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. आज दि. ११ मार्च रोजी पंचायत समिती सभागृहात प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवड यांच्या अध्यक्षतेखाली सभापती व उपसभापती निवड प्रक्रिया पार पडली.

या निवडीनंतर उपस्थित मान्यवरांनी नव्याने निवड झालेल्या सभापती व उपसभापती यांचे अभिनंदन करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी दोन्ही पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करताना रोहा तालुक्याच्या विकासासाठी सर्व सदस्यांनी एकजुटीने काम करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.



दरम्यान, रोहा पंचायत समितीची निवडणूक ७ फेब्रुवारी रोजी पार पडली होती. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने सहा जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळवले. पंचायत समिती गणांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे ६, शिवसेनेचा १ आणि उबाठा गटाचा १ उमेदवार विजयी झाला आहे.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, तालुका अध्यक्ष विनोदभाऊ पाशिलकर, कार्याध्यक्ष समीर शेडगे, रोहा-अष्टमी नगरपरिषद नगराध्यक्षा वनश्री शेडगे, सुरेश मगर, किसन मोरे, जगन्नाथ धनावडे, वर्षा हेमंत देशमुख, अरुणा जानू हंबीर, माजी सभापती बाबुराव बामणे, अनिल भगत, जयवंत मुंडे, अनंत देशमुख, राजेंद्र पोकळे, नरेश पाटील, रोहिदास पाशिलकर, मनिषा पाटील, नंदकुमार म्हात्रे, संतोष भोईर, राकेश शिंदे, अनिल भगत, शेणवई सरपंच प्रगती देशमुख यांच्यासह अनेक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुरूड पं.स.सभापतीपदी निलेश घाटवळ उपसभापतीपदी अश्विनी जंगम



**मुरुड: प्रतिनिधी**

मुरुड पंचायत समितीवर शिवसेनेचे वर्चस्व आहे.येथे चार पंचायत समिती सदस्य पैकी तीन सदस्य शिवसेनेचे असल्याने मुरुड पंचायत समितीवर एक हाती सत्ता मिळाली आहे.पूर्ण बहुमत असल्याने मुरुड पंचायत समितीवर शिवसेनेचे सभापती म्हणून निलेश घाटवळ यांची तर उप सभापती म्हणून अश्विनी जंगम यांची निवड करण्यात आली आहे.

यावेळी पिठासीन अधिकारी तथा तहसीलदार-आदेश डफळ,नायब तहसीलदार संजय तवर, पंचायत समिती गटविकास अधिकारी राजेंद्रकुमार खताळ, महसूल सहाय्यक -प्रतिक पावसकर, सहाय्यक गटविकास अधिकारी -मंगेश पाटील आदिंसह अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

पिठासिन अधिकारी आदेश डफळ यांचेकडे आलेल्या अर्जाची छाननी केली असता शिवसेना शिंदे पक्षांचे सभापती पदाकरीता व उपसभापती पदाकरिता आलेले उमेदवाराचे अर्ज वैध ठरविले.तर भाजप उमेदवाराच्या अर्जावर सुचकाची सही नसल्याने तो बाद झाला .पिठासिन अधिकारी तथा तहसीलदार-आदेश डफळ यांनी अवैध ठरविले.यामुळे वैद्य अर्जापैकी सभापती पदासाठी शिंदे शिवसेना पक्षांकडून निलेश शांताराम घाटवळ व उपसभापती पदाकरीता अश्विनी संजय जंगम यांना विजयी घोषित करण्यात आले.

# गरीबांचा फ्रीज बाजारात दाखल

## उन्हाची चाहूल लागताच माठांची मागणी वाढली

**खोपोली : प्रतिनिधी**

उन्हाची चाहूल लागताच अनेकांचे पाय गरीबांचा फ्रीज म्हणून ओळखला जाणारा माठ यांच्याकडे वळत असल्याचे दृश्य सध्या अनेक ठीकाणी पहावयास मिळत आहे.

माठाचे पाणी आरोग्यासाठी लाभदायक असून या पासून अनेक फायदे होत असतात. यामुळे अनेकजण उन्हाळ्यामध्ये माठ खरेदी करीत असतांना पहावयास मिळत आहे. होळीच्या नंतर उन्हाची दाहकता वाढत आहे.यामुळे या माठाचे महत्व आजही आबाधित आहे.



दरवर्षी उन्हाळयात सर्वसामान्यांची तहान भागविण्यासाठी पाणपोई म्हणून या माठाचा हॉटेल,तसेच विविध ठिकाणी वापर केला जात असल्यामुळे तालुक्याच्या ठिकाणी उन्हाळ्याच्या झळा चांगल्याच जाणवू लागल्या आहे. फेब्रुवारी महिन्यात च्या सुरुवातीस उन्हाच्या झळा सौम्य स्वरुपाच्या होत्या मात्र होळीच्या नंतर उन्हाचा दाह वाढू लागली आहे.

यामुळे येणारा उन्हाळा तीव्र स्वरूपाचा होणार असल्याचे तर्क नागरिक यांच्याकडून वर्तवले जात आहे. उन्हाळ्यांची चाहूल लागताच आपली तृष्णा शांत करण्यासाठी अनेक जन थंड पेय यांच्याकडे आकर्षित होत असतात.

फ्रिजचे पाणी अनेकांना त्रास दायक असल्यांने प्रत्येक नागरीक माठ खरेदि करीत असतो. यामुळे कुंभार समाजाला रोजगार मिळत असतो. माठाला दरवर्षी उन्हाळ्यात मागणी वाढत असते. तरी सुद्धा श्रीमंत वर्गालाही या माठाचे आकर्षण आहे.

माठातील थंडगार पाणी आणि चवीमध्ये माधुर्य असते. यामुळे माठाला गरीबांचा फ्रीज म्हटले असे संबोधले जाते.

# खोपोलीत ज्येष्ठ नागरिकाला आभासी अटक

## सव्वीस लाख उकळले

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली शहरातील सेवानिवृत्त जेष्ठ नागरिकाला तीन दिवस आभासी अटकेत ठेवून त्याच्याकडील २६ लाख ४० हजार रुपये रक्कम उकळल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी खोपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विना नगर खोपोली येथे राहणारे जेष्ठ नागरिक बँकेतून सेवानिवृत्त झालेले आहेत. १२ फेब्रुवारी ते ५ मार्च दरम्यान घडलेल्या घटनेत अनोळखी आरोपीत याने मोबाईल वरून तक्रारदार जेष्ठ नागरिक यांना राष्ट्रीय तपास अधिकारी असल्याचे सांगून व्हॉटसअप कॉल करुन तुमच्या नावे नाशिक येथे सिमकार्ड चालु असुन त्यावरुन अश्लिल संदेश पाठवले जात आहेत तसेच पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया या संस्थेमध्ये संबंधीत फसवणुक प्रकरणात तुमची कागदपत्र वापरली जात आहेत अशी बतावणी केली.

ज्येष्ठ नागरिकाला अटकेची भीती घालून बँकेत असलेली त्यांची रक्कम क्षीरसागर टेक्सटाईल, सोलापुर यांचे नावे असलेल्या बँकेत पाठवण्यास सांगितले. घाबरलेल्या ज्येष्ठ नागरिकांनी सदरची रक्कम आरोपीच्या खात्यात वर्ग केल्यानंतर तुम्ही सदर केस मधुन मुक्त झाले बाबतची नोटीस तुमच्या व्हॉटसअपवर येईल तसेच तीन दिवसात तुमची रक्कम तुम्हाला परत केली जाईल असे सांगितले. परंतु तीन दिवसानंतर देखील रक्कम खात्यात जमा न झाल्याने तसेच आरोपीचा मोबाईल देखील बंद येत असल्याने फसवणूक झाल्याची बाब जेष्ठ नागरिकांच्या लक्षात आली. याबाबत फसवणूक झालेल्या जेष्ठ नागरिकांने खोपोली पोलीस ठाणे येथे अज्ञात आरोपी विरुद्ध तक्रार दिली असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस निरीक्षक सचिन हिरे हे करीत आहेत.

# श्रीवर्धन पंचायत समितीच्या प्रभारी सभापतीपदी पुजा शिंदे बिनविरोध



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन पंचायत समितीच्या प्रभारी सभापतीपदी पुजा प्रशांत शिंदे यांची बिनविरोध निवड झाल्याने तालुक्यात राजकीय चर्चांना वेग आला आहे. पंचायत समिती सभापती पद अनुसूचित जमातीसाठी आरक्षित असताना त्या प्रवर्गातील सदस्य निवडून न आल्यामुळे हे पद रिक्त राहण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. मात्र भारतीय जनता पार्टी व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी यांच्या युतीतून पुजा शिंदे यांची प्रभारी सभापती म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली.

यापूर्वी २०२१ पर्यंत पंचायत समितीतील सभापती व उपसभापती पदांवर शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांच्यात राजकीय स्पर्धा होती. यावेळी मात्र बदललेल्या राजकीय समीकरणांमुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाठिंब्याने भारतीय जनता पक्षाने पुजा शिंदे यांना आराठी गणातून उमेदवारी दिली होती. त्या वेळीही त्यांनी दणदणीत विजय मिळवत आपली राजकीय ताकद दाखवून दिली होती.

## दुखवटा

### हरेश तांडेल



**उरण :** येथील सामाजिक कार्यकर्ते हरेश धाकल्या तांडेल यांचे शनिवार, ७ मार्च रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे.मृत्यू समयी त्यांचे वय ६५ होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, मुलगा, जावई, नातू , भाऊ असा त्याचा कुटुंब परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी सोमवार दिनांक १६ मार्च रोजी श्री क्षेत्र माणकेश्वर येथे तर दिवस कार्य बुधवार दिनांक १८ मार्च रोजी बालई येथील राहत्या घरी होणार आहे. कोणत्याही प्रकारचे दुखवटे स्वीकारले जाणार नसल्याचे तांडेल कुटुंबीयांनी कळवले आहे.

पान १ वरुन

## राजिप अध्यक्ष भाजपचा होणार; आज निवडणुक

विश्वसनीय सुत्रांनी दिलेल्या महितीनुसार शिवसेनादेखील राजिपच्या सत्तेत येण्यास उत्सुक आहे. त्यादृष्टीने प्रयत्न सुरू झाले असून तिन्ही पक्षांच्या वरिष्ठांमध्ये मुंबईत चर्चा सुरू आहे. या चर्चेत अंतिम निर्णय घेतला जाईल.

रायगड जिल्हा परीषद अध्यक्ष उपाध्यक्षपदाची निवडणूक १२ मार्च रोजी होणार आहे. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्षपदाच्या निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. रायगड जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन सभागृहात अध्यक्ष व उपाध्यक्ष पादाच्या निवडणूकीसाठी गुरुवारी सभा आयोजित करण्यात आली आहे. सकाळी ११ ते दुपारी १ या कालावधीत उमेदवारी अर्ज दाखल करून घेतले जातील. दुपारी २ वाजता बैठक सुरू होईल. त्यात उमेदवारी अर्जांची छाननी होईल. ज्यांचे अर्ज वैध ठरले आहेत त्यांची नावे जाहीर केली जातील. त्यानंतर अर्ज मागे घेण्यासाठी कालावधी दिला जाईल. गरज भसल्यास अध्यक्ष व उपध्यक्ष या दोन्ही पदांसाठी मतदान घेण्यात येईल.

रायगड जिल्हा परिषदेचा अध्यक्ष भाजपचाच होणार हे गृहित धरून भाजपने अलिबागमध्ये आनंदोत्सवाची तयारीदेखील सुरू केली आहे. नियोजन भवन येथील अध्यक्ष व उपाध्यक्षपदाची निवडणूकीचा निकाल लागल्यानंतर अलिबाग समुद्रकिनारी असलेल्या मैदानावर भाजप राष्ट्रवादी काँग्रेसचा विजयी मेळावा होणार आहे.

रायगड जिल्हा परिषदेत महायुती सत्तेत यावी यासाठी चर्चा सुरू आहेत. असे असले तरी रायगड जिल्हा परिषदेचा अध्यक्ष मात्र भाजपचाच होणार हे निश्चित आहे, असे भाजपच्या एक वरिष्ठ नेत्याने सांगितले.

रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक २३३
www.ramprahar.com
◆ गुरुवार, १२ मार्च २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## आरटीई प्रवेश प्रक्रियेला १८ मार्चपर्यंत मुदतवाढ; पालकांना दिलासा

**नागपूर :** विद्यार्थी प्रवेशासाठी महत्वाच्या आरटीई अंतर्गत प्रवेश प्रक्रियेत आता न्यायालय आणि शिक्षण विभागाच्या मुदतवाढीमुळे पालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. तीन दिवसांची अतिरिक्त मुदत देण्याचे उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने राज्य सरकारला निर्देश दिले आहेत. शिक्षण विभागाने आठ दिवसांची मुदतवाढ दिली आहे. न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती राज वाकोडे यांच्या खंडपीठाने शंकर आत्राम यांनी दाखल केलेल्या रिट याचिकेवरील सुनावणीदरम्यान हा अंतरिम आदेश दिला. राज्य सरकारने १२ फेब्रुवारी २६ रोजी काढलेल्या शासन निर्णयातील एक किलोमीटरची मर्यादा आणि फक्त दहा शाळांची निवड ही अट होती. आता न्यायालयाने याचिकाकर्त्याला त्यांच्या निवास स्थानापासून तीन किलोमीटर परिसरातील शाळेत अर्ज करण्याची मुभा दिली आहे. दरम्यान, उच्च न्यायालयाने तीन दिवसांची मुदतवाढ दिली असली तरी शिक्षण विभागाने ८ दिवसांची मुदतवाढ दिली आहे. शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) २५ राखीव जागांवरील २०२६-२७ च्या प्रवेश प्रक्रियेस आठ दिवसांची मुदतवाढ देण्यात आली आहे. १० मार्च ही शेवटची तारीख होती. आता १८ मार्चपर्यंत अर्ज भरता येणार आहेत. मंगळवारी विहित वेळेपर्यंत जिल्ह्यातील सात हजार ८१ रिक्त जागांसाठी १७ हजार ३१९ अर्ज ऑनलाइन प्राप्त झाले.

# पनवेल पंचायत समितीवर भाजपचे कमळ

## ■ सभापतीपदी रंजना वास्कर, तर उपसभापतीपदी भूपेंद्र पाटील

### लाल बावट्याच्या वर्चस्वाला पूर्णविराम





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुका पंचायत समितीच्या राजकारणात ऐतिहासिक बदल घडला असून पहिल्यांदाच भारतीय जनता पक्षाचे कमळ या समितीवर फुलले आहे. भाजपच्या वतीने करंजाडे गणातून निवडून आलेल्या रंजना सदाशिव वास्कर सभापतीपदी तर आदई गणातून निवडून आलेले भूपेंद्र सदानंद पाटील हे उपसभापती विराजमान झाले आहेत. अनेक दशकांपासून पंचायत समितीवर असलेला शेतकरी कामगार पक्षाचा एकछत्री अंमल आता संपुष्टात आली आहे.

या निवडीनंतर घोषणा, ढोलताशा आणि फटाक्यांच्या जल्लोषात मिरवणूक काढण्यात आली. यावेळी आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. विजय अद्भुतपूर्व असला तरी या विजयी जल्लोषात विनम्रपणा स्पष्टपणे जाणवत होता. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, महापौर नितीन पाटील, माजी सभागृह नेते व विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर, युवा नेते प्रितम म्हात्रे यांच्यासह इतर नेतेमंडळी, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी सभापती, उपसभापती यांचे अभिनंदन केले. त्यानंतर मार्केट यार्ड येथे त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. **(पान ८ वर..)**

> **पंचायत समितीमध्ये सत्ता यावी ही अनेक वर्षांची ईच्छा होती, ती पूर्ण झाली. या अनुषंगाने नागरिकांचे काम जलदगतीने आणि योग्यप्रकारे होणार आहेत. या विजयात प्रत्येक कार्यकर्त्याचा सहभाग आहे. सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन!**
>
> **-लोकनेते रामशेठ ठाकूर**

> **गेली २० वर्षे अरुणशेठ भगत तळमळीने काम करत आहेत. प्रत्येक कार्यकर्त्याच्या सुखदुःखात धावणारे ते नेते आहेत. त्यामुळे या विजयात त्यांचा मोठा वाटा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण कार्यकर्त्यांच्या पाठीशी कायम उभे राहिले आहेत. एवढा मोठा आपण विजय मिळवला असला तरी आपण विनम्र आहोत. १६ पैकी १५ जागा जिंकून अभूतपूर्व यश मिळवले असले तरी पुढच्या वेळी १०० टक्के जागा जिंकायच्या आहेत. महायुतीमधील घटक पक्ष आणि कार्यकर्ते, मतदार, नागरिकांचे आभार!**
>
> **-आमदार प्रशांत ठाकूर**

> **अनेक वर्षांची प्रतीक्षा होती ती पूर्ण झाली आहे. आजचा हा सोहळा आपल्या सर्वांसाठी अभिमानाचा आहे. जबाबदारी वाढली आहे. ती पारदर्शकपणे पार पाडू आणि विकासाचे चक्र चालू ठेवूया.**
>
> **-आमदार महेश बालदी**

**(रायगड जिल्ह्यातील इतर पंचायत समित्यांचे वृत्त पान २, ५ आणि ७ वर..)**

## घरगुती, उद्योगांचे वीज दर कमी होणार

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची महत्त्वपूर्ण घोषणा



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील घरगुती तसेच औद्योगीक वीज दर जास्त असल्याबद्दल नेहमी टीका होत असल्याच्या पार्श्वभूमीवर घरगुती तसेच उद्योगांचे दर टप्प्याटप्प्याने पुढील पाच वर्षांत कमी करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केली. घरगुती वापराचे १०० युनिटपर्यंतचे वीज दर पुढील पाच वर्षांत २६ टक्क्यांपर्यंत कमी होणार आहेत.

राज्यात विजेचे दर अधिक असल्याबद्दल उद्योजकांच्या संघटनांकडून चिंता व्यक्त केली जाते. विशेषत: शेजारील गुजरात, कर्नाटकमध्ये राज्याच्या तुलनेत वीज दर कमी असल्याने उद्योजक शेजारील राज्यांमध्ये जाऊ लागल्याची उद्योजकांची तक्रार असते. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी वीज दरात कपात करण्याची घोषणा केली. वीज दर घरगुतीप्रमाणेच व्यापारी व उद्योगांसाठीही कमी केले जातील, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

पुढील पाच वर्षांत घरगुती वापराच्या विजेचे दर हे २६ टक्के कमी होणार आहेत. त्याची सुरुवात या वर्षापासून होईल. १०० युनिटपर्यंत वीज दर हे २६ टक्के कमी होतील. ३०० युनिटपर्यंत पाच टक्के दर कमी होतील. औद्योगिक ग्राहकांसाठी वीज दरात प्रति युनिटला २ रुपये १७ पैशांची सूट दिली जाईल, असे फडणवीस यांनी जाहीर केले. २०३० पर्यंत दरवर्षी वीज दर १.२ टक्के कमी होतील. सध्या दरवर्षी नऊ टक्के वीज दरवाढ होते. पुढील काळात वीज दर कमी होणार आहेत. राज्य शासनाने सुमारे ८५ हजार कोटी खर्च करून वीज व्यवस्थेत सुधारणा करण्याची कामे हाती घेतली आहेत. त्यातून ६६ हजार कोटींची वीज बचत होणार आहे.

## 'महाराष्ट्राची अर्थव्यवस्था दोन वर्षांत युएई आणि सिंगापूरपेक्षा मोठी होणार'

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राचा जीडीपी २०१३ - १४ मध्ये १६ लाख कोटी होता. पुढील दहा वर्षांत आम्ही तो ५१ लाख कोटींवर नेला. आमच्या काळात राज्याची अर्थव्यवस्था तीपटीहून अधिक वाढली. ही गती पाहता, येत्या दोन-तीन वर्षांत महाराष्ट्र सिंगापूर आणि युएईसारख्या बलाढ्य अर्थव्यवस्थांनाही मागे टाकेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी (दि.११) विधानसभेत व्यक्त केला.

अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देताना ते बोलत होते. विरोधकांनी उपस्थित केलेले विविध मुद्दे खोडून काढत त्यांनी राज्याच्या 'ट्रिलियन डॉलर' अर्थव्यवस्थेचा रोडमॅप सभागृहासमोर मांडला. विरोधकांच्या टीकेला सांख्यिकीय पुराव्यांनी उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले की, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था विस्तारत आहे. महाराष्ट्र हे वेगळे राष्ट्र असते, तर आपली अर्थव्यवस्था जगात ३०वी असती. पहिल्या ३५ देशांचा विचार केला तर महाराष्ट्राने ऑस्ट्रिया, थायलंड, नॉर्वे, फिलिपाईन्स, व्हिएतनाम आणि बांगलादेश या देशांनाही मागे टाकत मोठी अर्थव्यवस्था उभी केली आहे.

पुढील २-३ वर्षांत युएई आणि सिंगापूर यांच्या अर्थव्यवस्थेलाही मागे टाकू. अर्थसंकल्पात छत्रपती शिवाजी महाराजांचा उल्लेख केलेला नाही, अशी टीका आमदार जयंत पाटील यांनी केली होती. त्यावर मुख्यमंत्री म्हणाले, हे सरकार छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराजांना कधी विसरू शकत नाही. कारण, ते होते म्हणून आम्ही आहोत, असेही त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री म्हणाले, राज्याचे दरडोई उत्पन्न तीन लाख ४७ हजार रुपयांपर्यंत वाढले आहे. दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत महाराष्ट्र देशात पाचव्या क्रमांकावर असला, तरी लोकसंख्या आणि जीएसडीपीचा विचार केला तर राज्य अव्वल असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## सायबर गुन्हे रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करा -आमदार प्रशांत ठाकूर

### लवकरच महा सायबर सेफ ॲप सुरू होणार -मंत्री योगेश कदम

**पनवेल, मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्यात वाढत्या सायबर फसवणुकीच्या पार्श्वभूमीवर सरकारने प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक मजबूत करण्याचा निर्णय घेतला असून सायबर जनजागृतीसाठी तसेच महा सायबर सेफ हे विशेष ॲप लवकरच सुरू करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी दिली.

अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या अनुषंगाने विधिमंडळात आमदार प्रशांत ठाकूर यांनी ऑनलाईन गेमिंग आणि सायबर फसवणुकीमुळे मध्यमवर्गीय नागरिकांमध्ये भीती आणि असुरक्षिततेची भावना वाढत असल्याचे निदर्शनास आणून दिले. अनेक वेळा सायबर गुन्ह्यांच्या तक्रारी नोंदवून घेतल्या जात नाहीत किंवा तपास प्रक्रियेला विलंब होतो, अशी तक्रार त्यांनी केली. सन २०२४ व २०२५ या कालावधीत ऑनलाईन गेमिंगसंदर्भात १२० गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. राज्यात सायबर कार्यालयात २६ तज्ज्ञ सल्लागार आहेत तसेच सुमारे एक हजार पोलीस अधिकाऱ्यांना सायबर गुन्ह्यांबाबत विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे. गुन्ह्यांची संख्या कमी दिसत असली तरी गुन्हे नोंदण्याकडे पोलीस सहकार्य करीत नाहीत अशा तक्रारी आहे. त्यामुळे अधिकाधिक प्रकरणे उघडकीस येऊन त्यांची प्रभावी नोंद व तपास व्हावा, यासाठी स्वतंत्र डिजिटल प्लॅटफॉर्म तयार करून सातत्याने पुनरावलोकन (रिव्ह्यू) करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने सरकारने याबाबत भूमिका घ्यावी असेही त्यांनी सभागृहात सूचित केले.



मंत्री योगेश कदम यांनी या प्रश्नावर उत्तर देताना सांगितले की, ऑनलाईन गेमिंगच्या बाबतीत यापूर्वी कायद्याचा कडक आधार नव्हता, मात्र केंद्र सरकारने नवीन कायदे लागू केल्यानंतर आर्थिक व्यवहार किंवा गुंतवणुकीच्या माध्यमातून होणाऱ्या अनियमिततेवर कारवाई करण्यासाठी अधिक सक्षम कायदेशीर चौकट उपलब्ध झाली आहे.सायबर गुन्हेगार दररोज नवीन तंत्रज्ञान वापरताना दिसत आहेत. सध्या इचलन ॲप्लिकेशन द्वारे सायबर चोरीचे गुन्हे झाले आहेत. अशा सर्व गुन्हयांना आळा घालण्यासाठी आता सायबर सेल तयार केले आहे आणि त्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घेतला आहे. **(पान ८ वर..)**

## आखाती तणावात भारतीयांचा बळी

### २८ व्यापारी जहाजेही अडकली

**नवी दिल्ली :** अमेरिका-इस्रायल-इराण संघर्ष बाराव्या दिवशी पोहोचला असून या तणावाचा परिणाम समुद्री वाहतुकीवरही दिसू लागला आहे. व्यापारी जहाजांवर झालेल्या हल्ल्यात दोन भारतीय खलाशांचा मृत्यू झाला असून एक जण बेपत्ता असल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाने दिली आहे.

परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी बुधवारी दिलेल्या माहितीनुसार, मध्यपूर्वेत सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर व्यापारी जहाजांवर झालेल्या हल्ल्यांमध्ये दोन भारतीय नागरिकांनी प्राण गमावले आहेत, तर एक जण अजूनही बेपत्ता आहे. भारताच्या बंदरे, जहाज वाहतूक आणि जलमार्ग मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, सध्या पर्शियन आखातात २८ भारतीय व्यापारी जहाजे असून त्यावर एकूण ७७८ भारतीय खलाशी कार्यरत आहेत.

## देशात भीती पसरवण्याचे काँग्रेसचे षडयंत्र

### प. आशियातील युद्धावरून पंतप्रधानांचा हल्लाबोल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पश्चिम आशियातील सध्याच्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेस आणि डाव्या पक्षांवर थेट हल्ला चढवत गंभीर आरोप केला. देशात भीतीचे वातावरण निर्माण करण्यासाठी या पक्षांकडून अफवा पसरवल्या जात असल्याचे पंतप्रधान म्हणाले. एका रॅलीला संबोधित करताना ते म्हणाले, पश्चिम आशियातील परिस्थितीमुळे भारतीयांची चिंता होणे स्वाभाविक आहे, कारण तिथे आपले लाखो बांधव कार्यरत आहेत. संकटकाळात भारतीयांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी आपली सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



पंतप्रधान मोदी यांनी आरोप केला की, काँग्रेस पक्ष या जागतिक संकटातही आपली राजकीय पोळी भाजून घेत आहे. देशात परिस्थिती बिघडावी आणि भारतीय नागरिक तिथे संकटात अडकावेत, यासाठी काँग्रेस जाणीवपूर्वक चिथावण्याचा बेजबाबदार प्रयत्न करत आहे. यातून मोदींना शिव्या देण्याचा एक नवीन कार्यक्रम सुरू करण्याचा विरोधकांचा डाव असल्याचेही त्यांनी नमूद केले, मात्र गल्फ देशांमधील मित्र राष्ट्रांच्या सरकारांकडून आपल्या नागरिकांची काळजी घेतली जात असल्याचे समाधान त्यांनी व्यक्त केले.

यावेळी पंतप्रधान मोदी यांनी पुन्हा एकदा 'आत्मनिर्भर भारत'चा उल्लेख केला. पुन्हा भर दिला. काँग्रेस आणि डाव्या पक्षांनी आपल्या कार्यकाळात देशाला परकीय देशांवर अवलंबून ठेवले, तर सध्याचे सरकार देशाला स्वावलंबी बनवत आहे. ऊर्जा क्षेत्रातील परकीय अवलंबित्व कमी करण्यासाठी सौर ऊर्जा आणि इलेक्ट्रिक वाहनांना (EV) सरकारने मोठे प्राधान्य दिले आहे.

सौर ऊर्जेची क्षमता वाढवण्यासोबतच केरळशारख्या राज्यांतही नवीन प्रकल्पांवर काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. संकटकाळात आत्मनिर्भरता ही काळाची गरज असल्याचे सिद्ध झाले असून, विरोधकांच्या चुकीच्या प्रचारापासून सावध राहण्याचे आवाहन पंतप्रधानांनी जनतेला केले आहे.



## संपादकीय

# अमेरिका-रिलायन्स भागीदारी

अमेरिका-इस्रायल-इराण युद्धामुळे जागतिक ऊर्जा क्षेत्र कमालीचे तणावाखाली आलेले असताना अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताच्या रिलायन्स इंडस्ट्रीजच्या भागीदारीतून अमेरिकेत नवा ऐतिहासिक तेल शुद्धीकरण प्रकल्प उभारण्याची घोषणा केली आहे. जगावर ऊर्जा संकट ओढवलेले असताना ट्रम्प यांनी केलेली ही घोषणा एक मोठी घडामोड मानली जाते आहे.

**अमेरिकन ऊर्जा क्षेत्रासाठीचा 'ऐतिहासिक प्रकल्प' असे वर्णन करीत राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेतील टेक्सासमध्ये प्रस्तावित असलेल्या एका महाकाय ऑइल रिफायनरी प्रकल्पाची घोषणा आपल्या ट्रुथ सोशल या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर केली. या प्रकल्पात भारताची रिलायन्स इंडस्ट्रीज सहकार्य करीत असल्याचेही त्यांनी जाहीर केले आहे. इस्रायल-अमेरिका यांनी संयुक्तपणे इराणवर केलेली कारवाई व त्यातून जागतिक तेल पुरवठ्यात निर्माण झालेल्या अडथळ्यांच्या पार्श्वभूमीवर तेलाच्या किंमतीबाबत जगभरात चिंतेचे वातावरण असताना ट्रम्प यांनी ही घोषणा केली आहे. ट्रम्प प्रशासन गेल्या काही काळापासून तेल आणि नैसर्गिक वायूचे दर कमी करण्याच्या अनेक पर्यायांचा विचार करत आहे. ही घोषणा त्याचाच एक भाग असल्याचेही सांगितले जाते. रिलायन्सची या प्रकल्पात नक्की किती टक्के भागीदारी असेल हे आता जाहीर झालेले नाही. पण रिलायन्स या प्रकल्पातील प्रमुख गुंतवणूकदार आहे असे दिसते. भारतातील आमचे भागीदार आणि त्यांची सर्वात मोठी खाजगी ऊर्जा कंपनी रिलायन्स यांना या भव्य गुंतवणुकीसाठी धन्यवाद असे ट्रम्प यांनी म्हटले आहे. भारतासाठी ही निश्चितच अभिमानास्पद बाब असून भारत-अमेरिका संबंधांवरही येत्या काळात अर्थातच त्याचा सकारात्मक प्रभाव पडेल. अमेरिकेची ऊर्जा संरचना मजबूत करण्याच्या दिशेने हे एक मोठे पाऊल असल्याचे ट्रम्प यांनी म्हटले असून भविष्यात तेलाच्या पुरवठ्याच्या दृष्टीने भारतालाही कदाचित यातून भरभक्कम नवा पर्याय उपलब्ध होऊ शकेल. तसे झाल्यास तेलासाठी भारताला आखाती देशांवर अवलंबून राहावे लागणार नाही. अमेरिकेत गेल्या ५० वर्षांत उभारली जाणारी ही पहिलीच नवीन ऑइल रिफायनरी आहे. अमेरिकेच्या टेक्सास राज्यातील ब्राउन्सविले येथे हा प्रकल्प उभारला जाणार असून रिफायनरी 'अमेरिका फर्स्ट रिफायनिंग' नावाच्या कंपनीद्वारे विकसित केली जाणार आहे. ब्राउन्सविले बंदरातून जहाजांमार्फत जगभरात कुठेही इंधन पाठविणे शक्य होणार असल्यामुळे या स्थळाची निवड करण्यात आल्याचे समजते. तीनशे अब्ज डॉलरचा हा ऐतिहासिक करार असल्याचे ट्रम्प यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. अमेरिकेत बाहेरची गुंतवणूक आणून ऊर्जा उत्पादन वाढवण्यासोबतच आपल्या देशवासियांसाठी रोजगार निर्माण करण्याचा ट्रम्प यांचा उद्देश आहे. त्यांच्या अमेरिका फर्स्ट धोरणाचाच हा प्रकल्प एक भाग असून अमेरिका फर्स्ट धोरणामुळे परवाना प्रक्रिया सुलभ केल्यामुळे आणि करात कपात केल्यामुळे देशात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक येत आहे असे ट्रम्प यांनी म्हटले आहे. या करारामुळे जगातील मोठ्या ऊर्जा गुंतवणूकदारांपैकी एक म्हणून रिलायन्सची ओळख प्रस्थापित होणार आहे. रिलायन्स इंडस्ट्रीजने या क्षेत्रातील तांत्रिक कौशल्याबाबत जगभरात जे नाव कमावले आहे त्यामुळेच त्यांची या प्रकल्पाकरिता निवड झाली असावी. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उभारल्या जाणाऱ्या या प्रकल्पातील रिलायन्सच्या अनुभवाचा लाभ भविष्यात भारतालाही होईल. जगभरातील तेल शुद्धीकरण व इंधन व्यापारात रिलायन्स इंडस्ट्रीजचा दबदबा यातून निश्चितच वाढणार आहे. इंधन व्यापारातील भारताचे महत्त्वही त्यामुळे स्वाभाविकपणे वाढेल.**

# महिला दिन : आईने मुलाला समानतेची दीक्षा देण्याचा दिवस

भारतीय समाजाने परंपरांचा वारसा जपला आहे; या परंपरांमध्ये पितृसत्ताक विचारांचा पगडा अद्यापही दिसून येतो. घरामध्ये मुलगा आणि मुलगी यांना समान संधी, वागणूक आणि प्रोत्साहन मिळणे अजूनही सर्व स्तरांवर पूर्णत्वास गेलेले नाही. मुलाने कसे वागावे, मुलीने कसे वागावे, कोणते कपडे योग्य आणि कोणते अयोग्य, अशा अनेक पूर्वग्रहांनी अजूनही अनेक घरांची दारे बंदिस्त आहेत. या बंद दारांना उघडण्याची किल्ली म्हणजे शिक्षण,संवाद आणि आधुनिक दृष्टिकोन. आजच्या नवशिक्षित व अशिक्षित मातांनीही नव्या समाज निर्मितीसाठी आपले हे दायित्व समजून घेणे म्हणजे महिला दिन साजरे करणे होय.

लहानपणापासूनच मुलांना 'हे मुलांचे काम, हे मुलींचे काम' असे शिकवले तर त्यांच्या मनावर लिंगभेदाचे ठसे उमटतात. यामुळेच आपल्यापेक्षा वयस्क आईला पिण्याचे पाणी हातात मागणारी, जेवणाचे ताट धुवायला लावणारी, आंघोळीनंतर स्वत:ची चड्डी बनियनही धुवायला लावणारी पिढी अजूनही अस्तित्वात आहे. एकीकडे 'स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी' म्हणायचे आणि स्वतःचे ताट आईला धुवायला लावायचे. यामध्ये सर्वात वाईट म्हणजे आईने म्हातारपणाची काठी म्हणून धन्यता मानायची, ही संस्कृती आपल्यातला लिंगभेद कधीही नष्ट करणार नाही. त्यामुळे मुलगा असो की मुलगी लहानपणापासूनच घरकाम, खेळ, बालसंगोपन, आई-वडिलांच्या म्हातारपणाची जबाबदारी , आर्थिक निर्णयप्रक्रिया यामध्ये समान सहभागाची सवय लावणे गरजेचे आहे. किंबहुना घरातील वडिलांनी याबाबत आदर्श पुढे ठेवणे गरजेचे आहे.

सहशिक्षण आणि परस्पर आदराची जाणीव ही समतेची पहिली पायरी आहे. शाळा आणि घर या दोन्ही ठिकाणी 'आपली मैत्रीण ही कुणाची तरी बहीण आहे' आणि 'आपल्या बहिणीलाही मित्र असू शकतो' ही सहज आणि सन्मानपूर्वक मान्यता देणे,ती मुलांमध्ये रुजविणे आवश्यक आहे. एवढेच नव्हे तर स्त्री व पुरुष या लिंगासोबत एक तृतीय लिंगी समाज आपल्याच घरातून तयार होतो. अशा मुलांना मुलगा किंवा मुलगी म्हणून नैसर्गिक बदलानुसार जगण्याचे स्वातंत्र्य आहे. अशा तृतीय पंथीयांना देखील सन्मानाने जगण्याचा तुमच्या सारखाच अधिकार आहे, ही जाणीव मुलांना लहाणपणीच होणे आवश्यक आहे. ही जाणीव मुलांना संवेदनशील आणि जबाबदार नागरिक बनवते.



वयात येणे ही प्रत्येक मुलगा आणि मुलगी यांच्या आयुष्यातील नैसर्गिक प्रक्रिया आहे. या विषयांवर घराघरांत मोकळेपणाने, वैज्ञानिक दृष्टीकोनातून चर्चा होणे आवश्यक आहे. लैंगिक शिक्षण ही संस्कृतीवरील घाला नसून नव्या विज्ञानवादी संस्कृतीची पायाभरणी आहे. माध्यमिक शिक्षणात प्रजनन आणि लैंगिक आरोग्याबाबत योग्य मार्गदर्शन मिळाल्यास गैरसमज, भीती आणि चुकीच्या समजुती दूर होऊ शकतात. अगदी लहान वयातच 'गुड टच - बॅड टच' याची माहिती मुलांना देणे हे त्यांच्या सुरक्षिततेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. अशा शिक्षणामुळे मुलांमध्ये आत्मविश्वास वाढतो आणि ते स्वतःचे रक्षण करण्यास सक्षम होतात.सर्वात महत्त्वाचे म्हणजे भारतामध्ये घरात होणाऱ्या लैंगिक शोषणाला, नात्यात होणाऱ्या लैंगिक शोषणाला या छोट्याशा गोष्टीमुळे पायबंद बसू शकतो, हे लक्षात घेण्याचाही आजचा दिवस आहे.

घरामध्ये आईची भूमिका या परिवर्तनात अत्यंत महत्त्वाची ठरते. आई ही केवळ कुटुंबाची आधारवड नसून मूल्यांची पहिली शाळा असते. मुलगा आणि मुलगी यांच्यात कोणताही भेद न करता दोघांनाही समान प्रेम, समान शिस्त, समान जाणीव आणि समान संधी देणे हे तिच्या हातात आहे. मुलांना निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेणे, मुलींना स्वतःचे मत मांडण्याचे स्वातंत्र्य देणे, महिलांप्रती मुलांमध्ये आदर निर्माण करणे, या कृतीतून समतेचा पाया मजबूत होतो. कुणाचीही बहिण असो, तिच्यासोबत कसे वागावे, याचे बाळकडून प्रत्येक घरातील आईनेच देणे महत्वाचे आहे. घरातून हा भेद नाकारला, घरातून त्यासाठी कृतीशील वस्तूपाठ अंमलात आला तर 'निर्भया' प्रकरणासारख्या घटना देशात घडणार नाही. या पायाभरणीची शपथ घेण्याचाही आजचा दिवस आहे.

संपत्ती आणि वारसा या संदर्भातही समानतेची जाणीव रुजवणे आवश्यक आहे. 'बायकांना व्यवहारात ठेवू नये ', 'महिलांना व्यवहारातले काय कळते ', या पूर्वापार अंधश्रद्धांना दूर करण्याचाही आजचा दिवस आहे. शेतीच्या काही गुंठ्यांसाठी सही करण्यापुरतीच बहिणीची भूमिका मर्यादित नाही, हे समजून घेतले पाहिजे. जमिनीच्या बाबत तिचे स्वप्न, तिची मेहनत आणि तिचे निर्णय यांनाही स्थान असायला हवे. लहानपणापासूनच मुलींना आर्थिक साक्षरता, मालमत्तेची जाणीव आणि स्वावलंबनाचे शिक्षण देणे ही नव्या समाजव्यवस्थेची गरज आहे. यासाठी स्वतः आईने या समान हक्काची पेरणी लहानपणीच करण्याचा आजचा दिवस आहे.

कर्मकांड आणि रूढीपरंपरांमध्ये स्त्रियांच्या शुद्ध-अशुद्धतेच्या मान्यता आजही काही ठिकाणी आढळतात. परंतु नैसर्गिक शारीरिक प्रक्रिया ही कोणत्याही प्रकारे अपवित्रतेचे लक्षण नाही. देवाला जर काही अपवित्र वाटले असते तर त्यांनी ही क्रियाच निर्माण केली नसती. त्यामुळे शुद्ध अशुद्ध हा भेद कर्मकांडातूनच निर्माण झाला आहे.मासिक पाळी हा स्त्रीदेहाचा नैसर्गिक भाग आहे. यावर खुली चर्चा झाली पाहीजे. या काळात स्त्रियांना वेगळे ठेवणे, त्यांच्या हातचे अन्न न खाणे किंवा धार्मिक विधींमध्ये सहभागी होऊ न देणे या कालबाह्य समजुतींना आता तिलांजली देणे आवश्यक आहे. विज्ञाननिष्ठ, विवेकी आणि संवेदनशील दृष्टिकोन स्वीकारून अशा रूढींचा पुनर्विचार करणे हीच खरी संस्कृतीची प्रगती आहे. यातूनच आपली संस्कृती प्रगल्भ होईल. संस्कृती, धर्म, रुढी,परंपरांच्या नावाखाली ज्या घरांमध्ये हा अघोरी उच्छाद सुरू आहे, ती घरे सुसंस्कृत समजायची का यावर चिंतन करण्याचाही आजचा दिवस आहे.

सामाजिक व्यवहारातही समानतेची जाणीव महत्त्वाची आहे. मुलगी सासरी जाणे हीच एकमेव दिशा नसून घरजावई होणेही तितकेच सन्माननीय असू शकते, ही मानसिकता समाजात रुजवणे आवश्यक आहे. त्यामुळे जशी आपली मुलगी सासरी जाऊ शकते तसाच आपला मुलगा घर जावई जाऊ शकतो, हे सामाजिक सत्य बिंबविण्याचाही आज दिवस आहे.

कार्यालयातील महिलांच्या पेहरावावर किंवा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर उपरोधिक टिप्पणी करणे ही सवय थांबली पाहिजे. एखाद्या महिलेच्या पोशाखाबद्दल नकारात्मक प्रतिक्रिया देणे हे तिच्या व्यक्तिमत्त्वाचा अपमान तर आहेच, पण आपल्यातील समतेच्या शिक्षणातील उणीवही दर्शवते.परस्पर आदर आणि व्यावसायिकता ही आधुनिक समाजाची ओळख असली पाहिजे. आजच्या भारतात अशी परिस्थिती निर्माण व्हावी की अर्ध्या रात्री एकटा जाणारा मुलगा आणि एकटी जाणारी मुलगी, या दोघांच्या सुरक्षिततेत कोणताही फरक उरू नये. ही सुरक्षितता केवळ कायद्याने नव्हे, तर घराघरातल्या संस्कारांनी निर्माण होते. मुलगा आणि मुलगी यांच्यातील अंतर कमी करून, त्यांना समानतेचे आणि सहजीवनाचे मूल्य शिकवूनच हा बदल साध्य होईल.तो बदल साधण्यासाठी वचनबद्ध होण्याचा आजचा दिवस आहे.

जगातील अनेक देशांनी लिंग समानतेच्या दिशेने सातत्याने प्रयत्न केले आहेत. उदाहरणार्थ स्वीडन, नॉर्वे, फिनलँड या देशांमध्ये पालकत्व रजेचे धोरण स्त्री-पुरुष दोघांसाठी समान आहे. त्यामुळे मुलांची जबाबदारी केवळ आईची हा समज आपोआप कमी झाला. पाश्चात्त्य देशांमध्ये लिंगभेदाची समस्या पूर्णतः संपली असे म्हणता येणार नाही; परंतु ती कमी निश्चित झाली आहे. यासाठी वयाला अनुरूप लैंगिक शिक्षण अनिवार्य आहे. त्यामुळे शरीर, भावना आणि परस्पर आदर याबाबत खुला संवाद निर्माण झाला. भारतीय घटनेनेही कलम १४ व १५ अन्वये लिंगभेद अमान्य केला आहे.

प्लास्टिक प्रदूषणाला आळा घालण्यासाठी 'गो ग्रीन' संस्थेच्या पुढाकारातून पनवेल तालुका पोलीस ठाण्यात 'बॉटल बिन'ची स्थापना करण्यात आली आहे. गो ग्रीन संस्थेचे संस्थापक भरत सोनी यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला आहे. या बिनच्या माध्यमातून प्लास्टिक कचरा व बाटल्या एकत्र करून त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यास मदत होणार असून प्लास्टिक प्रदूषण रोखण्याचा यामागचा मुख्य उद्देश आहे.



भारतामध्ये वाढत चाललेल्या प्लास्टिक प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर 'गो ग्रीन' संस्थेने पर्यावरण संवर्धनासाठी महत्त्वपूर्ण पुढाकार घेत 'बॉटल बिन' हा अभिनव कचरा व्यवस्थापन बिन सादर केला आहे. हा बिन विशेषतः प्लास्टिक कचरा गोळा करणे, त्याचे विलगीकरण करणे आणि पुनर्वापरासाठी पाठवणे यासाठी डिझाइन करण्यात आला आहे. 'बॉटल बिन' सार्वजनिक उद्याने, सरकारी आणि शैक्षणिक संस्था, सहकारी संस्था, आरोग्य केंद्रे, समुद्रकिनारे, पर्यटन स्थळे, पेट्रोल पंप, ग्रामपंचायती तसेच रेल्वे आणि बस स्थानकांसारख्या ठिकाणी बसविण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.

यामुळे परिसर स्वच्छ राहण्यास मदत होण्यासोबतच प्लास्टिक कचऱ्याचे शास्त्रोक्त व्यवस्थापन होण्यास चालना मिळणार आहे. परिसरातील नागरिकांनी प्लॅस्टिकच्या वस्तूचा वापर टाळावे तसेच बाटल्या एकत्र करून त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी याची मदत घ्यावी, असे आवाहन वपोनि गजानन घाडगे यांनी केले आहे.

# वीर वाजेकर महाविद्यालयात मुलींसाठी आरोग्य जागृती

**उरण : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालय फुंडेच्या हेल्थ क्लब व तु. ह. वाजेकर माध्यमिक व उच्च माध्यमिक हायस्कूल यांच्या सयुंक्त विद्यमाने मुलींच्या विविध आरोग्य समस्या संदर्भात जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्र.प्राचार्य डॉ.आमोद ठक्कर, प्राचार्य साळुंखे बी बी, थोरात मॅडम, श्री.पाटोळे तसेच प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून डॉ. प्रणाली नामदेव दांडेकर, एम.डी. (स्त्रीरोग व प्रसूती – आयुर्वेद), सहाय्यक प्राध्यापक, प्रसूती तंत्र व स्त्री रोग विभाग, डॉ.जी.डी.पोल फाउंडेशन, YMT आयुर्वेदिक वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, खारघर, नवी मुंबई हे उपस्थित होते.

प्राचार्य डॉ.आमोद ठक्कर यांनी मुलींच्या समस्या महत्वाच्या आहेत त्याकडे दुर्लक्ष करू नये व जनजागृती वाढवणे गरजेचे असल्याचे मत मांडले. प्रमुख मार्गदर्शक डॉ. प्रणाली दांडेकर यांनी झउजऊ (पॉलीसिस्टिक ओव्हेरियन डिसीज) ही पुनरुत्पादक वयातील महिलांमध्ये आढळणारी एक सामान्य हार्मोनल स्थिती बद्दल माहिती दिली. अनियमित किंवा अनियंत्रित मासिक पाळी, चेहऱ्यावर/शरीरावर अतिरिक्त केस येणे, मुरूमे येणे, केस गळणे, वजन वाढणे आणि वंध्यत्व या प्रकारची लक्षणे PCOD मध्ये आढळतात असे नमूद केले.



खराब जीवनशैली, ताणतणाव, शारीरिक निष्क्रियता आणि अनुवांशिक घटक यामुळे PCOD होण्याची शक्यता बळावते. वेळीच उपचार न केल्यास टाईप २ मधुमेह, उच्च रक्तदाब आणि गर्भाशयाच्या अस्तराचा कर्करोग (endometrial cancer) यांचा धोका वाढू शकतो. कमी कर्बोदके, फायबरयुक्त आहार घेणे, नियमित व्यायाम, योगासने आणि वजन नियंत्रण करणे डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधोपचार घेऊन यावर नियंत्रण मिळवता येते असे नमूद केले. तसेच कॅन्सर सारखे गंभीर आजार आणि त्यांची लक्षणे, कारणे, प्रतिबंध, उपचार याबद्दल सखोल माहिती दिली. चर्चा सत्रात देण्यात आली. विद्यार्थिनींच्या आरोग्याबद्दलच्या शंकांचे निरसन केले गेले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.संतोष देसाई यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा.योगेश कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाला किशोर पाटील, धुरी, देवरे, खेडकर, सुहास नाईक १५० पेक्षा जास्त विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# सीकेटी कॉलेजमध्ये 'वेचूया काव्य फुले' कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, नवीन पनवेल (अधिकार प्रदत्त स्वायत्त) येथे मराठी भाषा गौरव दिन आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त 'वेचूया काव्य फुले' या कार्यक्रमाचे आयोजन मंगळवारी (दि.१०) करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात दुपारी १२ वाजता विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रिकेच्या अनावरणाने झाली. त्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ.एस के पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मुख्य कार्यक्रमास सुरुवात झाली.



या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्त्या म्हणून प्रसिद्ध कवयित्री आणि व्याख्यात्या वृषाली विनायक या उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन झाले आणि कविवर्य कुसुमाग्रज व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात मराठी विभागाचे प्रमुख प्रा. मा. म. अंबुलगेकर यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा परिचय करून दिला आणि सामाजिक न्यायासाठी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. यानंतर या शैक्षणिक वर्षात मराठी विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या वक्तृत्व, काव्यवाचन, निबंध, हस्ताक्षर आणि शुद्धलेखन, वादविवाद आणि कथालेखन या स्पर्धांमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शन प्रसिद्ध कवयित्री व व्याख्यात्या वृषाली विनायक यांनी केले. साऊ पेटती मशाल, साऊ आग ती जल्हाल या कवयित्री शीतल साठे यांच्या कवितेच्या सुमधुर गायनाने त्यांनी आपल्या व्याख्यानाला सुरुवात केली.

सध्याच्या अस्वस्थ वर्तमानात आपण अत्यंत असंवेदनशील पद्धतीने जगतो आहोत. आजूबाजूची परिस्थिती जाणून घेऊन, ती रक्तात भिनवलीत, तर ती लेखणीतून कवितेच्या रूपाने उतरेल. कविता ही विषयावर नाही तर आशयावर आधारित असते, अशा शब्दात त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. एस. के. पाटील यांनी अविद्यार्थ्यांना अभिजात दर्जा मिळालेली आपली मराठी भाषा, मराठी भाषा गौरव दिनाचे महत्त्व आणि साहित्याची समृद्ध परंपरा जपण्याचे आवाहन केले. सीकेटी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांपैकी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींचे प्रमाण सुमारे ६० टक्के असून हे केवळ क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी त्या काळात कर्मठ समाजाशी संघर्ष करून शिक्षणाची वाट विद्यार्थिनींना मोकळी करून दिल्यामुळेच शक्य झाले आहे, असे त्यांनी अभिमानाने नमूद केले.

सूत्रसंचालन आणि नियोजन मराठी विभागाच्या सहाय्यक प्राध्यापक नम्रता कडू यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख डॉ. बी. डी. आघाव, हिंदी विभागाचे प्रमुख डॉ. उद्धव भंडारे, महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. रमाकांत नवघरे, इंग्रजी विभागाचे प्राध्यापक डॉ. एस. एन. परकाळे, एनसीसी विभागाचे सहाय्यक प्राध्यापक साहिल पाटील आणि रुपेश माने यांच्यासोबत महाविद्यालयातील अन्य प्राध्यापक, कर्मचार आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्पीड ब्रेकर बसवण्याची मागणी

**रसायनी : प्रतिनिधी**

आपटा गावाच्या हद्दीत मेन रोड आहे येथुन दिवसभर ग्रामस्थांची ये-जा असते. बस स्टॅन्ड व लहान मुलांच्या शाळा ग्रामपंचायत व जाण्याचे येणाचे ठिकाण असून या भागात नेहमी गर्दी असते, परंतु पेण वरून आपट्यामध्ये येणाऱ्या गाड्या किंवा दांड फाटा वरून पेण व अलिबाग बाजूला जाणाऱ्या येणाऱ्या खासगी गाड्या बसेस रिक्षा या खूप वेगात जात असतात म्हणून या रोडवर येथे स्पीड ब्रेकर बसविणे गरजेचे आहे.

याबरोबर गावात हा मुख्य रोड आहे यामुळे येथे अपघात होण्याची शक्यता आहे आणि यापूर्वी येथे स्पीड ब्रेकर होता तो रोड करताना काढला गेला आहे, परंतु ग्रामस्थांची अशी मागणी आहे की येथे हा स्पीड ब्रेकर हवा आहे त्यामुळे वाहने हळू येतील व हळू जातील कारण येथून लहान मुले शाळेत जात असतात बस स्टॅन्ड पण जवळच आहे यामुळे ही या स्पीड ब्रेकरची येथे खूप गरज आहे तरी सार्वजनिक बांधकाम खात्याने याकडे लक्ष घालून येथे छोटासा स्पीड बेकर तयार केला पाहिजे.

# रायगडात पं. स. सभापती, उपसभापतीपदाची निवडणुक; महायुतीचे वर्चस्व

## पेण पंचायत समितीवर सभापती स्मिता पाटील तर उपसभापती संजय डंगर बिनविरोध



**पाली : प्रतिनिधी**

पेण पंचायत समिती सभापती उपसभापती पदाची निवडणूक आज पेण प्रांत अधिकारी प्रवीण पवार यांच्या अध्यक्षतेखाली झाली. सभापती पदासाठी स्मिता प्रमोद पिंट्या पाटील यांचा तर उपसभापती पदासाठी संजय कमळाकर डंगर यांचा असे दोनच अर्ज दाखल झाले. त्यामुळे सभापती, उपसभापती पदाची औपचारिकता शिल्लक होती. निवडणूक निर्णय अधिकारी प्रवीण पवार यांनी दुपारी २ वाजता सभापती पदावर स्मिता पाटील तर उपसभापती पदासाठी संजय डंगर यांची नियुक्ती झाल्याचे घोषित करुन प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन सभापती व उपसभापतीचे अभिनंदन केले. यानंतर नवनिर्वाचित सभापती उपसभापती यांचे अभिनंदन करण्यासाठी खासदार धैर्यशील पाटील माजी जिल्हा परिषद अध्यक्षा नीलिमा पाटील नगराध्यक्ष प्रितम पाटील व भाजपचे पदाधिकारी यांनी मोठ्या संख्येने गर्दी करीत पुष्पगुच्छ देऊन नवनिर्वाचित सभापती स्मिता पाटील व उपसभापती संजय डंगर यांचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

या निवडणुक विशेष सभेत भाजपचे सभापती स्मिता पाटील उपसभापती संजय डंगर नवनिर्वाचित सदस्यांमध्ये गटनेते विवेक सदानंद म्हात्रे, प्रदीप मधुशेट म्हात्रे, सुशांत खाकर, मेघा मंच्छीद्र पाटील कमळ पवार, अस्मीता प्रल्हाद पाटील, व शिवसेना उबाठाचे संजय भोईर व प्रिती प्रशांत पाटील यांची उपस्थिती होती. सभापती पदासाठी सकाळी ११ ते १.०० वाजेपर्यत नामनिर्देशन दाखल करण्याच्या वेळेत सभापती पदासाठी स्मिता प्रमोद पाटील यांचा एकमेव अर्जावर सूचक संजय डंगर यांची स्वाक्षरी तर उपसभापती पदासाठी संजय डंगर यांचे अर्जावर सूचक मेघा मंच्छीद्र पाटील यांच्या सहीनीशी अर्ज दाखल करण्यात आले.

विरोधी पक्षाचे शिवसेना उबाठा गटातील संजय भोईर यांचीही विशेष उपस्थिती होती. त्यामुळे सभापती व उपसभापती पदाची निवडणूक बिनविरोध होऊन विनातक्रार आनंदी वातावरणात व उत्साहात पार पडली. नव्या सभापती आणि उपसभापतीनी एकमेकांना शुभेच्छा देत आपापल्या दालनात जाऊन कार्यभार स्वीकारला

यावेळी सभापती स्मिता पाटील यांनी बोलताना माझ्या सर्व सहकारी सदस्यांना विश्वासात आणि सोबत घेऊन पंचायत समिती समितीतील प्रशासन पारदर्शकतेने जनतेला कोणत्याही प्रकारची अडचण भासू देणार नसल्याचे स्पष्ट सांगितल.



## सुधागड पाली पंचायत समितीवर फडकला महायुतीचा झेंडा

**पाली : प्रतिनिधी**

पाली सुधागड पंचायत समितीवर महायुतीचा निर्विवाद झेंडा फडकला आहे. सुधागड पाली पंचायत समितीवर भाजप, राष्ट्रवादी, रिपाइंची निर्विवाद , व बिनविरोध सत्ता प्रस्थापित झाली असून सभापतीपदी भाजपच्या जागृती राजेश मानकर, उपसभापती राष्ट्रवादीचे संदेश शेवाळे यांची वर्णी लागली आहे.

तर सदस्य म्हणून भाजपच्या सुनीता किसन लेंडी यांची वर्णी लागली आहे. या यशात राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, भाजप जिल्हाध्यक्ष तथा माजी खासदार धैर्यशील पाटील, मंत्री आदिती तटकरे, आमदार रविशेठ पाटील, माजी आमदार अनिकेत तटकरे यांचे मार्गदर्शन लाभले. सुधागडच्या इतिहासात प्रथमच पंचायत समिती सभापतीपदी भाजपला संधी मिळाल्याने भाजप कार्यकर्त्यात प्रचंड जोश व उत्साह पहावयास मिळाला.

निवडणूक प्रक्रियेचे काम तहसीलदार उत्तम कुंभार, नायब तहसीलदार ज्ञानेश्वर अडसुळे यांनी पाहिले. पंचायत समितीवर महायुतीची सत्ता येताच सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. यावेळी भाजप जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील म्हणाले की आजचा दिवस सुधागड तालुक्याला कलाटणी व वेगळी दिशा देणारा दिवस आहे. भाजपचे सभापती तर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे उपसभापती आज विराजमान झाले आहेत. मी नवनिर्वाचित पदाधिकारी यांचे स्वागत व अभिनंदन करतो. जनतेच्या हिताकरिता, तालुक्याच्या सर्वांगीण व शाश्वत विकासाकरिता आपल्याकडून अधिक भरीव काम होईल अशा शुभेच्छा देतो असे धैर्यशील पाटील म्हणाले.

## खालापूर पं.स. कमळ फुलले; सभापतीपदी कृष्णा पारंगे



**चौक, रसायनी, खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर पंचायत समितीचे नवनिर्वाचित सभापती म्हणून भारतीय जनता पक्षाचे नेते कृष्णा गंगाराम पारंगे व उप सभापती पदावर शिवसेनेचे भाई उर्फ रघुनाथ शिंदे यांची निवड झाल्याने पंचायत समितीवर तब्बल नऊ वर्षांनी महायुतीचा झेंडा फडकला आहे.सभापती, उप सभापती यांच्यावर कार्यकर्त्यांनी व आमदार महेंद्र थोरवे यांनी अभिनंदनाचा वर्षाव केला.

आज खालापूर पंचायत समिती कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून तहसीलदार अभय चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली ही निवडणूक पार पडली, यावेळी गटविकास अधिकारी संदीप कराड उपस्थित होते, तर पंचायत समिती चे आठही सदस्य उपस्थित होते.

खालापूर पंचायत समितीवर महायुतीचे संख्याबळ असल्याने ही निवडणूक बिनविरोध होईल असे वाटत होते. सभापती पदासाठी भारतीय जनता पक्षाचे कृष्णा पारंगे व राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या देवयानी देशमुख यांनी अर्ज दाखल केला होता, तर उप सभापती पदासाठी शिवसेना पक्षाचे भाई उर्फ रघुनाथ शिंदे व शिवसेना उबाठा गटाच्या प्रमिला पाटील यांनी अर्ज दाखल केल्याने ही निवडणूक चुरशीची होणार असेच वातावरण निर्माण झाले होते.

नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत खालापूर पंचायत समितीवर तीन भारतीय जनता पक्ष, दोन शिवसेना, दोन शिवसेना उद्धव ठाकरे गट आणि एक अजित पवार असे बलाबल आहे. अखेर हात वर करून मतदान करण्यात आले, सभापती कृष्णा पारंगे यांना पाच मते, तर देवयानी देशमुख यांना तीन मते पडली, तर उपसभापती भाई शिंदे यांना ही पाच तर प्रमिला पाटील यांना तीन मते मिळाली, अध्यक्ष अभय चव्हाण यांनी कृष्णा पारंगे व उप सभापती भाई शिंदे यांना निवडूण आल्याचे जाहीर केले.

आमदार महेंद्र थोरवे यांनी पंचायत समिती येथे नवनिर्वाची सभापती, उप सभापती, सदस्य यांचे अभिनंदन केले, यावेळी भारतीय जनता पक्षाचे उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, मंडळ अध्यक्ष प्रवीण मोरे, माजी जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे, युवा तालुका प्रमुख रोहित विचारे, महादेव गडगे, महिला आघाडी प्रमुख रेश्मा आंग्रे, जिल्हा सचिव प्रशांत खांडेकर, ज्ञानेश्वर गायकवाड, माजी सभापती कांचन पारंगे, तालुका प्रमुख संदेश पाटील, कैलास म्हात्रे, भारतीय जनता पक्षाचे विठ्ठल मोरे, राजू शहासणे, विनोद भोईर, माजी सरपंच राजू मोरे, माजी सरपंच भूषण पारंगे, अप्पा शिंदे, माजी उपसभापती विश्वनाथ पाटील,कृष्णा गंगाराम पारंगे हे उपस्थित होते.



## ◆ माणगाव सभापतीपदी शिवसेनेचे विलास शिंदे तर उपसभापतीपदी राष्ट्रवादीच्या मनीषा मालोरे

**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**

माणगाव पंचायत समितीवर शिवसेना – राष्ट्रवादी कॉंग्रेस महायुतीचा झेंडा फडकला असून सभापतीपदी शिवसेनेचे विलास यशवंत शिंदे तर उपसभापतीपदी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या मनीषा संदेश मालोरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

माणगाव पंचायत समितीची सार्वत्रिक निवडणुकीत ८ पैकी ५ जागांवर शिवसेना शिंदे गटाचे पंचायत समिती सदस्य निवडून येऊन शिवसेनेने या पंचायत समितीवर सर्वाधिक जागांवर विजय संपादन केला होता. त्यानंतर राज्यात महायुतीची सत्ता असल्याने माणगाव पंचायत समितीत शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष हे सभापती व उपसभापती निवडणुकीच्या निमित्ताने एकत्रित आले. सभापती व उपसभापती पदासाठी बुधवार दि.११ मार्च रोजी महाराष्ट्र भूषण डॉ.नानासाहेब धर्माधिकारी सभागृह पंचायत समिती माणगाव येथे निवडणुकीचे प्राधिकृत अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी माणगाव डॉ.संदीपान सानप व माणगाव पंचायत समितीच्या गटविकासअधिकारी शुभदा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत निवडणूक प्रक्रिया पार पडली.

सभापती पदासाठी शिवसेनेचे पाटुणूस पंचायत समिती गणातून निवडून आलेले विलास यशवंत शिंदे तर उपसभापती पदासाठी तळाशेत पंचायत समिती गणातून निवडून आलेल्या राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या मनीषा संदेश मालोरे या दोघांचे एकमेव नामनिर्देशन अर्ज दाखल झाल्याने माणगाव पंचायत समिती सभापतीपदी विलास शिंदे तर उपसभापतीपदी मनीषा मालोरे हे बिनविरोध निवडून आल्याचे निवडणुकीचे प्राधिकृत अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी माणगाव डॉ.संदीपान सानप यांनी जाहीर करून नवनिर्वाचित सभापती शिंदे व उपसभापती मालोरे यांचे पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देऊन अभिनंदन केले.

या निवडणुकीच्या प्रक्रियेवेळी माणगाव पंचायत समितीचे सर्व नवनिर्वाचित सदस्य, सदस्या तसेच शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेस, भाजप महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शिवसेनेचे संपर्क प्रमुख अरुण चाळके, जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते शेखरशेठ देशमुख, राजिपचे माजी सभापती ज्ञानदेव पवार, माजी जिल्हाप्रमुख अनिल नवगणे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष काका नवगणे, तालुकाप्रमुख ॲड. महेंद्र माणकर, युवासेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे, भाजप दक्षिण रायगड युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे, नवनिर्वाचित राजिप सदस्य अविनाश नलावडे, माजी जिल्हापरिषद सदस्य संदेश मालोरे, युवानेते निलेश केसरकर,जगदीश दोशी, हुसेन राहटविलकर, प्रसाद धारिया,डॉ. परेश उभारे, फैमिद जामदार आदी उपस्थित होते.

## पोलादपूर पं. स. सभापतीपदी शिवसेनेचे अविनाश शिंदे, उपसभापतीपदी अनिता भिलारे यांची बिनविरोध निवड

**पोलादपूर: प्रतिनिधी**

पंचायत समिती पोलादपूरच्या सभापती व उपसभापती पदाची निवडणूक बॅरिस्टर नाथ पै सभागृहामध्ये निवडणूक निर्णय अधिकारी तहसीलदार कपिल घोरपडे आणि गटविकास अधिकारी दीप्ती गाट यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले असता पंचायत समितीच्या सभापतीपदी शिवसेनेचे अविनाश शिंदे आणि उपसभापतीपदी अनिता अनिल भिलारे यांची बिनविरोध निवड झाल्याचे





जाहीर करण्यात आले.

पंचायत समिती आणि जिल्हा परिषद सार्वत्रिक निवडणुकीमध्ये पोलादपूर तालुक्यामध्ये शिवसेनेचे तीन व शेका पक्षाच्या एक पंचायत समिती सदस्या निवडून आल्या. पंचायत समितीचे सभापती पद हे सर्वसाधारण जाहीर झाल्याने पहिल्या अडीच वर्षासाठी या आरक्षणानुसार कोतवाल बुद्रुक पंचायत समिती गणाचे नवनिर्वाचित सदस्य अविनाश शिंदे यांचा एकमात्र उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला. लोहारे पंचायत समिती गणाच्या नवनिर्वाचित सदस्य अनिता अनिल भिलारे यांचा एकमेव उमेदवारी अर्ज उपसभापती पदासाठी करण्यात आला.

पंचायत समिती पोलादपूरच्या प्रांगणामध्ये झालेल्या सभेमध्ये माजी राजिप सभापती व मंत्री पत्नी सुषमाताई गोगावले, मंत्री कन्या कोमल मोरे, माजी राजिप उपाध्यक्ष तथा लोहारे जि प गटाचे नवनिर्वाचित सदस्य चंद्रकांत कळंबे, बळीराम फौजदार, तालुका संपर्कप्रमुख किशोर जाधव, तालुका प्रमुख निलेश अहिरे, महिला संघटक सुवर्णा कदम, शहर प्रमुख सुरेश पवार, शांताराम गोळे, दशरथ उतेकर, माजी उपसभापती मीनाताई साळुंखे व शकुंतला महाडिक, अस्मिता पवार, अनिल भिलारे, अनिल पवार, संजय मोदी, रामदास कळंबे, तानाजी निकम, लक्ष्मण मोरे तसेच पंचायत समितीचे सदस्य अनिल दळवी आणि हर्षदा कांबळेकर तसेच शिवसेना व शेकपचे नेते पदाधिकारी उपस्थित होते.

## कर्जत पं.स. महिला राज : सभापती, उपसभापती बिनविरोध

**कर्जत: प्रतिनिधी**

कर्जत पंचायत समितीच्या सभापती आणि उप सभापती पदाच्या निवडणुकीत कर्जत परिवर्तन आघाडीचे दोन्ही उमेदवार बिनविरोध निवडून आले. सभापती पदावर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या नमिता सुधाकर घारे तर उपसभापती पदी शिवसेना ठाकरे गटाच्या चित्रा जगदीश ठाकरे यांची बिनविरोध निवड झाली.

कर्जत पंचायत समितीच्या नागरिकांचा मागास प्रवर्ग राखीव सभापती आणि उपसभापती पदाची निवडणूक कर्जत पंचायत समिती कार्यालयात झाली. पिठासीन अधिकारी तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांच्याकडे निर्धारित वेळेत नामांकन अर्ज दाखल झाले. सभापती पदासाठी बीड बुद्रुक पंचायत समिती गणाच्या सदस्या नमिता सुधाकर घारे यांनी तर उपसभापती पदासाठी मोठे वेणगाव गणातून विजयी झालेल्या चित्रा जगदीश ठाकरे यांचे अर्ज प्राप्त झाले होते. दुपारी दोन वाजता विशेष सभा सुरू झाली त्यावेळी दाखल झालेल्या दोन्ही अर्जांची छाननी करण्यात आली. त्यावेळी सभापती व उपसभापती पदाचे अर्ज छाननी मध्ये वैद्य ठरले. यानंतर पिठासीन अधिकारी डॉ. जाधव यांनी सभापती पदावर नमिता घारे यांची बिनविरोध निवड झाली असल्याचे तर उपसभापती पदावर चित्रा ठाकरे यांची बिनविरोध झाली असल्याचे जाहीर करण्यात आले.

या विशेष बैठकीला पंचायत समितीचे नवनिर्वाचित सदस्य नमिता घारे, चित्रा ठाकरे, भगवान चंचे, कमलाबाई शिंगवा, अक्षय तिटकारे, कविता पादीर, नमिता श्रीखंडे, महेश खारीक, नितीन धुळे, सुषमा पवाळी, तसेच सदस्य उपस्थित होते. विरोधी पक्षाचे दोन्ही सदस्य अनुपस्थित होते.



## उरण सभापतीपदी महेश म्हात्रे

**उरण : बातमीदार, वार्ताहर**

उरण तालुक्यातील पंचायत समितीच्या सभापती व उपसभापती पदांवरही शिवसेना (ठाकरे गट), काँग्रेस, राष्ट्रवादी (श्री शरदचंद्र पवार गट), शेतकरी कामगार पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांची एकत्रित युती असलेल्या महाविकास आघाडीचाच झेंडा फडकला आहे.

पंचायत समितीच्या सभापती व उपसभापती पदाची निवडणूक बुधवारी (११ मार्च) रोजी झाली. सभापतीपदासाठी शेकापचे ज्येष्ठ सदस्य महेश म्हात्रे तर तर उपसभापती पदासाठी शिवसेना (उबाठा) गटाचे सदस्य परेश ठाकूर यांची निवड झाली आहे. निवडणूक बुधवारी दुपारी २ वाजता पार पडली असून उरणचे तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांनी पीठासीन अधिकारी म्हणून काम पाहिले आहे. अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.


### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**मुदतवाढ सूचना**

**ई निविदा सूचना क्र. ७८/२०२५-२०२६ (मुंबई) करीता**

दिनांक २०/०२/२०२६ रोजी दैनिक आपलं महानगर, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई , दैनिक रामप्रहर, रायगड, दैनिक सागर, रत्नागिरी, दैनिक मुंबई तरूणभारत, मुंबई या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्याबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | तळोजा व टीटीसी औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती..... तळोजा टप्पा १ व २, ऐरोली सांडपाणी उदंचन केंद्रातील विविध ठिकाणी बसविलेल्या पंपांची वार्षिक तत्वावर देखभाल व दुरुस्ती करणे. | ₹ २७,४७,१५९.०० |
| २. | रोहा येथील पाणीपुरवठा योजेनेची देखभाल व दुरूस्ती....... रोहा येथील जलशुद्धीकरण केंद्रातील कर्मचारी वसाहत व अग्निशमन केंद्र कॉलनी येथे व्यायामशाळेची उपकरणे व बाह्य खेळाच्या उपकरणांची एक वर्षाच्या कालावधीकरीता वार्षिक तत्वावर देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ १०,३६,४१९.०० |

उपरोक्त कामाबाबत निविदा प्रपत्र दिनांक २०/०३/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

# आयपीएल २०२६ स्पर्धेत होणार बदल

## १० सामन्यांबाबत निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२६ स्पर्धेला २८ मार्चपासून सुरूवात होणार आहे, पण यासाठीचे वेळापत्रक अद्याप जाहीर केलेले नाही. असे असताना या स्पर्धेत एक बदल होण्याची दाट शक्यता वाढली आहे. हा बदल म्हणजे या स्पर्धेतील सामन्यांची संख्या वाढू शकते.

बीसीसीआय आयपीएल २०२६ स्पर्धेत आणखी १० सामन्यांचे आयोजन करण्याची शक्यता आहे. आतापर्यंत या स्पर्धेत प्रत्येक संघ साखळी फेरीत १४ सामने खेळत होता. त्यामुळे या पर्वापासून प्रत्येक फ्रेंचायझीला १६ सामने खेळावे लागू शकतात. आयपीएल स्पर्धेत एकूण १० संघ भाग घेतात. बीसीसीआयने यापूर्वी आयपीएल सामन्यांची संख्या वाढवण्याबाबत चर्चा केली होती. २०२५ आणि २०२६ या पर्वात आयपीएल सामन्यांची संख्या



७४ वरून ८४ करण्याचा प्रस्ताव होता, पण मागच्या पर्वात तसं काही शक्य झालं नाही. सामन्यांमध्ये वाढ झाल्यास विदेशी खेळाडू अनुपलब्ध राहण्याची शक्यता होती. त्यामुळे मागच्या पर्वात बीसीसीआयने ७४ सामने खेळवले.

बीसीसीआयने यंदाच्या पर्वात ८४ सामने खेळवण्यास हिरवा कंदील दाखवल्याचं वृत्त द फायनान्शियर एक्स्प्रेसने दिलं आहे. त्यामुळे गेल्या पर्वाच्या तुलनेच यंदा १० सामने अतिरिक्त होतील असं सांगितलं जात आहे. इतकंच काय तर २०२७ आयपीएल स्पर्धेत ही संख्या आणखी १० सामन्यांनी वाढेल. म्हणजेच पुढच्या पर्वात ९४ सामने होण्याची शक्यता आहे. म्हणजेच प्रत्येक संघ १८ सामने खेळेल. नऊ सामने होम ग्राउंडवर होतील, तर उर्वरित नऊ सामने अवे ग्राउंडवर होतील. म्हणजेच, आयपीएल सीझन १९ मध्ये प्रेक्षकांना ८४ सामने पाहण्याची संधी मिळेल. तसेच पुढील वर्षी म्हणजेच २०२७ पासून इंडियन प्रीमियर लीगमध्ये ९४ सामने पाहण्याची संधी जवळजवळ निश्चित आहे.

आयपीएल मिडिया हक्क करारानुसार, बीसीसीआयने १८व्या आणि १९व्या पर्वात ८४ सामने होतील असं सांगितलं होतं. पण मागच्या पर्वात तसं झालं नाही, मात्र यंदाच्या पर्वात आयपीएल प्रसारकांनी पुन्हा एकदा सामन्यांची संख्या वाढवण्याची मागणी केली आहे.

दुसरीकडे, पुढच्या पर्वात १२ संघ खेळवले जातील अशीही चर्चा आहे, पण या निव्वळ सोशल मीडियावरील चर्चा आहे. सहा-सहा संघाचे दोन गट पाडून उपांत्यपूर्व, उपांत्य आणि अंतिम सामने खेळवले जातील, अशी चर्चा सोशल मीडियावर सुरू आहे. पण या चर्चांना तसा काही अर्थ नाही.

# बुमराहने टाकले सचिन तेंडुलकरला मागे

## नॉकआउट सामन्यात १६ विकेट्ससह अश्विनची बरोबरी




**मुंबई : प्रतिनिधी**

टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारतीय संघाने न्यूझीलंडवर ९६ धावांनी दणदणीत विजय मिळवत जेतेपदावर नाव कोरले. भारताचा स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह या विजयाचा खरा शिल्पकार ठरला. बुमराहने केवळ भारताला विजय मिळवून दिला नाही, तर क्रिकेटचे दैवत मानल्या जाणाऱ्या सचिन तेंडुलकरला मागे टाकले आहे.

अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या अटीतटीच्या सामन्यात बुमराहने आपल्या गोलंदाजीने न्यूझीलंडच्या फलंदाजांना अक्षरशः गुडघे टेकण्यास भाग पाडले. या सामन्यात त्याने चार विकेट्स घेऊन किवी संघाचे कंबरडे मोडले. या शानदार कामगिरीसाठी त्याला सामनावीर म्हणून गौरवण्यात आले. विशेष म्हणजे २०२४च्या विश्वचषकातही त्याला 'मालिकावीर' म्हणून सन्मानित करण्यात आले होते.

बुमराहने या सामन्यात घेतलेल्या चार विकेट्समुळे त्याने आयसीसी नॉकआउट सामन्यांमध्ये सर्वाधिक विकेट्स घेणाऱ्या भारतीय खेळाडूंच्या यादीत सचिन तेंडुलकरला मागे टाकले आहे. बुमराहने आता १६ विकेट्ससह आर. अश्विनची बरोबरी केली असून सचिन तेंडुलकर (१५ विकेट्स) याला मागे सोडले आहे.

**शमीचा वर्ल्ड रेकॉर्डही धोक्यात!**

सध्या ३२ वर्षांचा असलेला जसप्रीत बुमराह आपल्या कारकिर्दीच्या सर्वोच्च शिखरावर आहे. ज्या प्रकारे तो सध्या फॉर्मात आहे, ते पाहता आगामी आयसीसी स्पर्धांमध्ये तो मोहम्मद शमीचा २२ विकेट्सचा विक्रमही लवकरच मोडीत काढण्याची शक्यता आहे. जर बुमराहने हे यश मिळवले, तर तो आयसीसी बाद फेरीतील भारताचा सर्वात यशस्वी गोलंदाज ठरेल.

पान ३ वरुन..

# पनवेल पंचायत समितीवर भाजपचे कमळ

पनवेल आणि रायगड परिसरात शेतकरी कामगार पक्षाचे दीर्घकाळ वर्चस्व राहिले होते. गल्लीपासून दिल्लीपर्यंत या पक्षाचे लोकप्रतिनिधी सातत्याने निवडून येत होते, मात्र २००९ नंतर या वर्चस्वाला हळूहळू उतरती कळा लागली. सर्वप्रथम पनवेल नगर परिषदेत शेकापला धक्का बसला, त्यानंतर विधानसभा निवडणुकांमध्येही पराभवाचा सामना करावा लागला. त्याच काळात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भाजपने या मतदारसंघासोबत रायगड जिल्ह्यात मजबूत पकड निर्माण केली. आमदार प्रशांत ठाकूर यांनी सलग चार टर्म आमदार म्हणून नेतृत्व करताना राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलून टाकली. पनवेल महानगरपालिकेतही भाजपने सलग दुसऱ्यांदा एकहाती सत्ता प्रस्थापित केली.

शहरात भाजपची सत्ता असली तरी ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मात्र शेतकरी कामगार पक्षाचा लाल बावटा फडकत होता, मात्र २०१७ नंतर ग्रामीण भागातही भाजपचा प्रभाव वाढू लागला. त्याचे स्पष्ट चित्र नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत दिसून आले.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण आणि लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, युवा नेते परेश ठाकूर व प्रितम म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवण्यात आली. पनवेल पंचायत समितीच्या निवडणुकीत शेकापला एकही सदस्य निवडून आणता आला नाही. भाजपने १६ पैकी तब्बल १५ सदस्य निवडून आणत शेकापचा अक्षरशः व्हाईट वॉश केला.

सभापती पद सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी राखीव असल्यामुळे भाजपने करंजाडे गणातून विजयी झालेल्या रंजना वास्कर यांच्यावर विश्वास दाखवला आहे. त्या भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या कन्या असून अरुणशेठ भगत यांच्या राजकीय व सामाजिक कार्याचा बाळकडू त्यांना मिळाला आहे. त्याचबरोबरीने त्यांचे पती सदाशिव वास्कर यांनी कुंडेवहाळ ग्रामपंचायतीचे सरपंच म्हणून उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या कार्याची छापसुद्धा त्यांच्यावर आहे. उपसभापतीपदी निवड झालेले युवा नेते भूपेंद्र पाटील यांनी मागील टर्ममध्ये पंचायत समिती सदस्य म्हणून सक्षम व प्रभावी काम केले आहे. जनसंपर्काची उत्तम जाण आणि युवा संघटनाची मजबूत पकड ही त्यांच्या कार्याची जमेची बाजू मानली जाते.

गेल्या अनेक पंचवार्षिक निवडणुकांमध्ये पनवेल पंचायत समितीवर शेकापचा झेंडा फडकत होता आणि इतर पक्षांसाठी येथे विजय मिळवणे अत्यंत कठीण मानले जात होते. मात्र २०२६ च्या निवडणुकीत आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भाजपने हे समीकरण पूर्णपणे बदलून टाकले आहे. त्यामुळे पनवेलच्या ग्रामीण राजकारणात लाल बावट्याचा अध्याय संपून भाजपचा नवा अध्याय सुरू झाला असून त्या अनुषंगाने पनवेल पंचायत समितीच्या माध्यमातून तळागाळात विकास पोहोचविण्याचा मार्ग सुकर झाला आहे.

> कार्यकर्त्यांचा उर अभिमानाने भरून आणणारा आजचा दिवस आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या खांद्याला खांदा लावून काम करणार अरुणशेठ भगत आहेत. प्रत्येकाच्या सुखदुःखात धावून जाणारे अरुणशेठ भगत असे व्यक्तिमत्व आहे. अनेक वर्षांच्या मेहनतीला यश आले आहे.
>
> **-अविनाश कोळी**

> इतिहासात लिहिला जाणारा क्षण आहे. शेकाप शेकाप चालत आला यापुढे भाजप भाजप भाजप सत्ता कायम राहणार आहे.
>
> **-प्रितम म्हात्रे, युवा नेते**

## सायबर गुन्हे रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करा -आमदार प्रशांत ठाकूर

त्या अनुषंगाने देशातील सर्वात मोठे सेंटर महापे येथे सुरु करण्यात आले आहे. त्याचबरोबरीने राज्यातील ५० सायबर पोलिस ठाणे कार्यान्वित करण्यात आली आहेत. पोलीस अधिकाऱ्यांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले असून, मुख्यालयात आवश्यक आधुनिक साधने (टूल्स) उपलब्ध करून देण्यात आली आहेत. डार्क वेब, डिजिटल फसवणूक, खात्यांतील रक्कम गोठवणे (फ्रीज करणे) यांसारख्या बाबींवर प्रभावी कारवाईसाठी आवश्यक तांत्रिक क्षमता वाढविण्यात आली आहे. सायबर गुन्हे रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक (प्रिव्हेन्शन) उपाययोजनांबरोबरच जनजागृती हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. कोविडनंतर केंद्र सरकारने सायबर जनजागृती कार्यक्रम राबविला होता. त्याच धर्तीवर राज्य सरकारने सुमारे ४३ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद सायबर जनजागृतीसाठी केली आहे. दरमहा अंदाजे २१ कोटी संदेश नागरिकांपर्यंत पोहचविण्याचे नियोजन आहे. तसेच महा सायबर सेफ हे ॲप्लिकेशन सुरू करण्यात येत असून, सायबर फसवणुकीच्या विविध प्रकारांची माहिती, प्रतिबंधात्मक उपाय आणि तक्रार नोंदविण्याची सुविधा या माध्यमातून उपलब्ध होणार आहे.

एकंदरीत, सायबर गुन्ह्यांविरोधात आवश्यक तांत्रिक साधनसामग्री, कायदेशीर बळकटी आणि व्यापक जनजागृती या तिन्ही स्तरांवर सरकार कार्यरत असून, बदलत्या तंत्रज्ञानाच्या पार्श्वभूमीवर सातत्याने उपाययोजना अधिक प्रभावी करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

# मैदानात भावनांवर नियंत्रण ठेवायला शिका -वेंगसरकर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मैदानावर खेळत असताना आपल्या भावनांवर नियंत्रण ठेवायला शिका असा सल्ला भारताचे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांनी पनवेल येथे झालेल्या एच.डी.एफ.सी.बँक परिवर्तन कप या १४ वर्षाखालील मुलांच्या पारितोषिक वितरण समारंभात दिला.

दिलीप वेंगसरकर फौंडेशनच्या पनवेल येथील अकादमीच्या मैदानावर अंतिम सामन्यानंतर झालेल्या समारंभात ते बोलत होते. दरम्यान, अत्यंत अटीतटीच्या झालेल्या अंतिम फेरीच्या सामन्यात डिव्हाईन क्रिकेट अकादमी संघाने स्पोर्ट्‌र्स फील्ड संघावर केवळ १० धावांनी विजय मिळवत या स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.




स्पोर्ट्‌र्स फील्ड संघाने नाणेफेक जिंकून प्रतिस्पर्धी डिव्हाईन क्रिकेट अकॅडमि संघाला प्रथम फलंदाजीसाठी मैदानात उतरवले. काही अंशी त्यांचा हा निर्णय योग्यच ठरला, कारण डावखुरा फिरकी गोलंदाज लकी साकारिया याने १६ धावांत ४ बळी तर रांचो तेरवे (२०/२),ओम लोखंडे (२६/२) आणि स्वरूप मोरे (१८/२) यांनी प्रत्येकी दोन बळी मिळवून ४० षटकांच्या या सामन्यात प्रतिस्पर्धी संघाला ३१.१ षटकांतच १०२ धावांत गुंडाळण्याची किमया केली. माधव ठाकरे (३३) आणि योहान बारुआ (२१) यांनी ५१ धावांची सलामी दिली तर विवान गुर्जर याने आणखी १६ धावांची भर टाकली. मात्र त्यानंतर अन्य आठ फलंदाजांना दोन आकडी धावादेखील करता आल्या नाहीत.

या आव्हानाचा पाठलाग करताना स्पोर्ट्‌र्स फील्ड संघाच्या सलामीवीर रियाण तेरवे (८ चौकारांसह ४९ धावा) याने एकाकी झुंज दिली; पण अन्य फलंदाज फारशी चमक दाखवू शकले नाहीत. हृदान पाटील (९ धावांत ३ बळी) आणि माधव ठाकरे (८ धावांत ३ बळी) या माध्यम गती गोलंदाजांनी टिच्चून गोलंदाजी करीत त्यांच्या अन्य फलंदाजांना स्थिरावण्याची संधीच दिली नाही आणि अत्यंत चुरशीच्या या लढतीत १० धावांनी सनसनाटी विजय मिळविला. डिव्हाईन क्रिकेट अकादमी संघातील खेळाडूंनी कमी धावांत बाद झाल्यानंतर देखील उत्तम क्षेत्ररक्षण करून प्रतिस्पर्ध्यांवर कायम दडपण राखले. स्पर्धेतील सर्वोत्तम फलंदाज आणि अंतिम सामन्यातील सर्वोत्तम खेळाडू म्हणून डिव्हाईन क्रिकेट अकादमीच्या माधव ठाकरे (१११ धावा आणि ४ बळी) याची निवड करण्यात आली.

## टीम इंडिया ठरली सिक्सर किंग!

**मुंबई** : सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वातील भारतीय संघाने न्यूझीलंडला नमवत टी-२० जेतेपदावर कब्जा केला. भारतीय फलंदाजांनी स्पर्धेदरम्यान तब्बल १०६ षटकार मारल्याचे स्पष्ट झाले आहे. बाकी कोणत्याही संघापेक्षा हे प्रमाण काही पटींनी जास्त आहे.सर्वाधिक षटकारांच्या यादीत भारतीय संघानंतर वेस्ट इंडिज ७६ षटकारांसह दुसऱ्या स्थानी आहे. दक्षिण आफ्रिकेचा संघ ७२ षटकारांसह तिसऱ्या स्थानी आहे. षटकारांच्या बाबतीत श्रीलंका आणि झिम्बाब्वे हे दोन संघ तळाच्या स्थानी आहेत. या दोन्ही संघांनी ३७ षटकार वसूल केले. योगायोग म्हणजे या दोन्ही संघांना सुपर-८ फेरीचा अडथळा पार करता आला नाही. चौकारांच्या बाबतीतही भारतीय संघ अव्वल ठरला आहे. भारतीय फलंदाजांनी स्पर्धेदरम्यान १४७ चौकार लगावले आहेत. ११७ चौकारांसह न्यूझीलंडचा संघ दुसऱ्या, तर ११२ षटकारांसह इंग्लंडचा संघ तिसऱ्या स्थानी आहे.













पनवेल : तालुका पंचायत समितीच्या राजकारणात ऐतिहासिक बदल घडला असून पहिल्यांदाच भारतीय जनता पक्षाचे कमळ या समितीवर फुलले आहे. यानिमित्त भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मान्यवरांच्या उपस्थितीत जल्लोष केला. त्याची क्षणचित्रे...

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com